# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे

## परिपत्रक क्र.366/२०२१

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित काही महाविद्यालये आणि काही मान्यताप्राप्त संस्थांना स्वायत्त दर्जा प्राप्त झालेला आहे. तसेच नजीकच्या काळात आणखी काही महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्थांना स्वायत्त दर्जा प्राप्त होण्याची शक्यता आहे. स्वायत्त दर्जा प्राप्त संलग्नित महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या समस्या व अडचणी लक्षात घेऊन प्रशासनाच्या सुकरतेसाठी मार्गदर्शक नियमावली तयार करण्यासाठी मा. कुलगुरू यांनी समिती गठीत केली होती. सदर समितीने सादर केलेला अहवाल मा. कुलगुरू यांनी स्वीकारलेला असून यातील शिफारशी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ व सन २०१९ एकरूप परिनियम क्र. ३ मधील तरतुदी विचारात घेता स्वायत्तता दर्जा प्राप्त संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्थासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात येत आहेत:

१) स्वायत्त दर्जा : केवळ पात्र महाविद्यालयांना स्वायत्तता दर्जा मिळण्यासाठी सन २०१९ च्या एकरूप परिनियम क्र. ३ मधील ४ (१) तरतुदीनुसार विद्यापीठ काटकोरपणे कारवाई करेल.

अ) स्वायत्त महाविद्यालयासाठी विद्यापीठाकडे सादर केलेल्या प्रस्तावाची स्वायत्तता देण्याच्या निकषावर आधारित छाननी करुन त्यावर विद्यापीठ ३० दिवसांच्या आत योग्य तो निर्णय घेईल विद्यापीठाने प्रस्ताव फेटाळला असेल तर 'आख्यापक आदेशाद्वारे' ते महाविद्यालय आणि विद्यापीठ अनुदान आयोगाला कळविण्यात येईल.

ब) स्वायत्त महाविद्यालयाच्या विविध सांविधिक मंडळावर विद्यापीठ प्रतिनिधीचे नामनिर्देशन केले जाते. अशा प्रतिनिधींनी आपल्या निरीक्षणांचा वार्षिक अहवाल विद्यापीठास सादर करावा.

क) एखाद्या स्वायत्त महाविद्यालयामध्ये अनियमिता आढळल्यास किंवा बाह्य तज्ज्ञ समितीचा अहवाल किंवा तक्रार किंवा सांविधिक मंडळावरील विद्यापीठ प्रतिनिधींचे निरीक्षण या आधारावर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (१४) (क) तरतुदीनुसार स्वायत्त महाविद्यालयाची तपासणी किंवा चौकशी, चौकशी समितीमार्फत करण्यात येईल. या विषयी नियमाप्रमाणे स्वायत्त महाविद्यालयाला आपले म्हणणे अभिवेदनाव्दारे मांडण्याचा अधिकार असेल. जर स्वायत्त महाविद्यालयामध्ये अनियमितता सिद्ध झाली तर विद्यापीठामार्फत प्रचलित नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

२) नवीन पाठ्यक्रम सुरू करणे : सन २०१९ मधील एकरूप परिनियमातील कलम ३ (१) (एक) नुसार स्वायत्त महाविद्यालयांना शासनाची पूर्व परवानगी न घेता पदवी, पदविका किंवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्याचे स्वातंत्र्य असेल. स्वायत्त महाविद्यालयांना श्रेयांक गणनाच्या विद्यापीठाच्या प्रचलित पध्दतीमध्ये फेरफार करता येणार नाही. विद्यार्थ्याला अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेण्यापूर्वी त्या संपूर्ण अभ्यासक्रमातील घटक, अध्यापन पध्दती, मूल्यमापन पध्दतीने कशी आहे, हे जाणून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यामुळे सर्व प्रशासकीय सुविधेसाठी स्वायत्त

महाविद्यालयांनी संपूर्ण अभ्यासक्रम, पात्रता, अभ्यासक्रमाची उद्दिष्टे, विषयाचे नाव, घटकांचा तपशील, तासिका, श्रेयांक पध्दत, संदर्भ साहित्य, संदर्भ ग्रंथ, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, अंतर्गत मूल्यमापनाचे स्वरुप, सत्र परीक्षेचे स्वरुप, गुणांकन इत्यादी विषयी आणि त्याचबरोबर स्वायत्त महाविद्यालयांच्या नियामक मंडळ, विद्यापरिषद, अभ्यास मंडळ यांच्या अभ्यासक्रम संमत झालेल्या सभेच्या इतिवृत्ताची प्रत आणि ठरावाची प्रत विद्यापीठाला सादर करावी. ही माहिती स्वायत्त महाविद्यालयाच्या नियामक मंडळाच्या सभेचे इतिवृत्त पारित केल्यानंतर लगेच किंवा ज्या शैक्षणिक वर्षापासून अभ्यासक्रम सुरू करावयाचा आहे त्या लगत पूर्वीच्या दिनांक ०१ मार्च पर्यंत, जे अगोदर घडेल ते विद्यापीठाकडे पाठवावी. हा मसुदा विद्यापीठाच्या संबंधित अभ्यास मंडळांच्या बैठकीत अनुसमर्थनार्थ ठेवण्यात येईल. या मसुद्यात त्रुटी आढळल्यास इमेलव्दारे महाविद्यालयाला कळवून त्यांची एका आठवड्यात पूर्तता करुन घेण्यात येईल. अभ्यासक्रमाचा मसुदा परिपूर्ण असल्यास तसे स्वायत्त महाविद्यालयास इमेलद्वारे कळविण्यात येईल अभ्यासक्रमाचा परिपूर्ण मसुदा प्राप्त झाल्यावर संलग्नता विभागाकडून संबधित अभ्यासक्रमास संलग्नता प्रदान करण्यात येईल.

दिनांक ०१ मार्च नंतर किंवा अपूर्ण माहिती पाठविल्यास स्वायत्त महाविद्यालयाला पुढील शैक्षणिक वर्षात अभ्यासक्रम सुरु करता येणार नाही.

३) सन २०१९ चा एकरूप परिनियम क्र. ३ मधील स्वायत्त महाविद्यालयाला विद्यमान अभ्यासक्रमाची पुनर्रचना करता येईल. त्या पुनर्रचित अभ्यासक्रमाचा संपूर्ण तपशिल विद्यापीठाला ज्या शैक्षणिक वर्षापासून सदर अभ्यासक्रम लागू करावयाचा आहे त्या लगत पूर्वीच्या दिनांक ०१ मार्च पर्यंत सादर करणे अनिवार्य असेल.

४) स्वायत्त महाविद्यालयांच्या पदवी आणि पदविकांची संज्ञासूची विद्यापीठ अनुदान आयोगाचे दिनांक ०५ जुलै, २०१४ च्या राजपत्रात प्रकाशित झालेल्या संज्ञासूचीप्रमाणे असणे आवश्यक आहे.

५) स्वायत्त महाविद्यालयाला विद्यापीठाने संलग्नता दिलेल्या विद्याशाखांतील नवीन पदवी किंवा पदविका सुरु करता येतील. त्या व्यतिरिक्त इतर विद्याशाखेच्या पदवी किंवा पदविका यांना राज्य शासनाची, विद्यापीठाची आणि संबंधित शिखर संस्थेची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

६) स्वायत्त महाविद्यायाने प्रथम वर्षी नव्याने पदवी किंवा पदविका सुरु करताना विद्यापीठाने ठरवून दिलेल्या प्रवेश क्षमतेचे पालन करणे बंधनकारक राहिल.

७) नवीन पदवी किंवा पदविका सुरु करण्यापूर्वी स्वायत्त महाविद्यालयाने आवश्यक मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधांची तरतूद करणे आवश्यक आहे.

८) नव्याने पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यापूर्वी स्वायत्त महाविद्यालयाने त्याच अभ्यासक्रमाच्या पदवी अभ्यासक्रमाची एक बॅच पूर्ण केलेली असावी.

९) सन २०१९ चा एकरूप परिनियम क्र.३ मधील कलम ९ (३) (४) नुसार स्वायत्त महाविद्यालयात सुरु असलेल्या अभ्यासक्रम, अभ्यासक्रमाचे शुल्क विद्याशाखांच्या अर्हता, प्रवेश प्रक्रिया संबंधित

पायाभूत सुविधा याचा तपशील, विविध समित्या, कक्ष, सांविधिक मंडळाच्या बैठकांचे कार्यवृत्तांत, महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर अंतर्गत गुणवत्ता समितीच्या बाह्य तज्ज्ञ घटकाच्या सदस्यांचा दरवर्षी किमान एक प्रगती अहवाल संकेतस्थळावर प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तसेच सदरचा प्रगती अहवाल विद्यापीठाला सादर करणे आवश्यक आहे.

१०) स्वायत्त महाविद्यालयाने सन २०१९ चा एकरूप परिनियम क्र.३ कलम ३ (२) नुसार अभ्यासक्रमाच्या कायम संलग्नतेसाठी एकदा संलग्नता शुल्क भरावयाचे आहे. स्वायत्त महाविद्यालयात सुरु असलेल्या अभ्यासक्रमासाठी संलग्नता/मान्यता शुल्काच्या दोन वर्षासाठीच्या रक्कमे एवढे शुल्क विद्यापीठाकडे भरावे. त्यानंतर सुरु होणाऱ्या नवीन अभ्याक्रमांनाही मान्यता/संलग्नता शुल्क दोन वर्षाच्या रकमे एवढे विद्यापीठाकडे भरावे.

११) स्वायत्त महाविद्यालयाने दरवर्षी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडे विद्यापीठ अनुदान आयोग आणि विद्यापीठाच्या प्रचलित मार्गदर्शक तत्त्वानुसार/मापदंडानुसार विहित केलेल्या नमुना तालिकेप्रमाणे निकाल जाहिर करण्यापूर्वी गुणवत्ता पत्रक (लेजर/रजिस्टर) सॉफ्ट कॉफी आणि हार्ड कॉफीमध्ये सादर करावे. गुणपत्रकाची पडताळणी करुन ते संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचेकडून साक्षांकित करुन घ्यावे.

१२) स्वायत्त महाविद्यालयाने सर्व अभ्यासक्रमाच्या सर्व वर्षांच्या परीक्षा शुल्कापैकी १५ टक्के एवढे शुल्क विद्यापीठाकडे जमा करणे आवश्यक आहे.

१३) स्वायत्त महाविद्यालयाने एकाच वेळी दोन पेक्षा अधिक अभ्यासक्रम/तुकडया सुरू करू नयेत.

१४) स्वायत्त महाविद्यालयाने संशोधन केंद्राविषयी विद्यापीठाचे परिपत्रक्र क्र. १५६/२०२१ नुसार प्रचलित पध्दतीने नियमन करावे.

१५) स्वायत्त महाविद्यालयाने आणि विद्यापीठाने नवीन अभ्यासक्रमाची नोंद करण्यासाठी शासन आणि समाज कल्याण आयुक्ताकडे अभ्यासक्रम सुरु करण्याआधीच प्रस्ताव पाठवावा.

**टीप: या पूर्वीचे या विभागाचे परिपत्रक क्र. २२८/२०२१ जावक क्र. सीए/१२६३, दि. २६ ऑगस्ट, २०२१ रद्द समजण्यात यावे.**

गणेशखिंड, पुणे—४११००७ )<br>
जावक क्र. सीए/२११२ )<br>
दिनांक १५ डिसेंबर, २०२१ )

(डॉ. प्रफुल्ल पवार )<br>
कुलसचिव

**प्रत :**

१. मा.प्राचार्य/संचालक, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था
२. मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
३. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश आणि पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
४. उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष ) प्रस्तुत विद्यापीठ
५. उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष) प्रस्तुत विद्यापीठ
६. सहा.कुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ